महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक :१४४२(२)(३)/२०२२/तेवीस                                                  दिनांक : २५ जून, २०२४.

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-२०२२ गट-क संवर्गाची टंकलेखन कौशल्य चाचणी व पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची मुलाखत एकाच दिवशी आलेल्या उमेदवारांचा मुलाखतीचा दिनांक बदलणेबाबत.

संदर्भ :- जाहिरात क्रमांक ०३६/२०२३.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील उमेदवारांच्या पहिल्या टप्प्यातील मुलाखती या दिनांक २ जुलै, २०२४ ते दिनांक १२ जुलै, २०२४ या कालावधीत घेण्यात येणार असून त्यासंदर्भातील प्रसिद्धीपत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

२. याच कालावधीत गट-क संवर्गाकरिता “मराठी-इंग्रजी टंकलेखन कौशल्य” चाचणीचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये काही उमेदवार पोलीस उपनिरीक्षक मुलाखत व टंकलेखन कौशल्य चाचणीकरिता एकाच दिवशी पात्र झालेले आहेत अशा उमेदवारांनी टंकलेखन कौशल्य चाचणीस नियोजित दिवशी प्रविष्ट व्हावे. अशा उमेदवारांच्या पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरिता मुलाखती पुढील नियोजित टप्प्यात घेण्यात येतील व पोलीस उपनिरीक्षक मुलाखतीचा सुधारित दिनांक उमेदवारांच्या प्रोफाईलवर व लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. सुधारित दिनांकानुसार सदर उमेदवारांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग, त्रिशुल गोल्ड फिल्ड, प्लॉट नं.३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे उपस्थित रहावे.

उपसचिव (परीक्षोत्तर)(अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.